स्वातंत्र संग्राम सैनिक , समाज सेवक बाबूराव बनकर यांच्या निधनामुळे ज्येष्ठ मार्गदर्शक हरपला - सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर - स्वातंत्र्य संग्राम सैनिक , समाजसेवक बाबूराव गोविंदराव बनकर यांच्या निधनामुळे जेष्ठ मार्गदर्शक हरपला अशी शोकभावना वने व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

बनकर कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर बाबुराव बनकर यांना सद्‌गती देवो आणि त्यांच्या कुटुंबीय आणि मित्र परिवाराला या दुःखातून लवकर सावरण्याचे बळ देवो अशी प्रार्थनाही ना.श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे